ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १९ फेब्रुवारी, १९६४ | अंक ४

## विविध माहिती

**फुटपाथवर राहणाऱ्यांच्यावर चित्रपट**—मुंबईत फुटपाथवर जीवन घालविणाऱ्या लोकांवर एक चित्रपट निर्माण करण्यांत आला असून, तो मॉस्को येथील कांहीं निवडक प्रेक्षकांना दाखविण्यांत आला. ह्या प्रेक्षकांत मुख्यत: चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि नट होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत चांगल्या दिवसांसाठीं धडपडणाऱ्या ह्या गृहहीनांचें जीवन चित्रपटांत दाखविण्यांत आलें आहे. प्रेक्षकांनीं चित्रपटाचें कौतुक केलें.

**खेळाच्या सामानाचें प्रदर्शन**—सॅन फ्रॅन्सिस्को येथें खेळाच्या साहित्याचें वार्षिक प्रदर्शन भरविण्यांत येत असतें. प्रदर्शनांत खेळाच्या साहित्याची निर्यात करण्यास उत्तेजन देणाऱ्या भारताच्या मंडळातर्फे माल पाठविण्यांत आला आहे. ह्या मालांत बेस बॉलच्या बॅटस, टेनिसच्या रॅकेटस्, गोल्फच्या काठ्या, फुटबॉल्स, मच्छीमारीचें साहित्य, बॉस्केट बॉल्स, इत्यादि साहित्य आहे. भारतीय मालाचा दर्जा व किंमत ह्यांच्याबद्दल माहिती देण्याची व्यवस्थाहि करण्यांत आली होती.

**भिलाईसाठीं आणखी दोन भट्ट्या**—भिलाई येथील पोलादाच्या कारखान्यासाठीं रशियांत आणखी दोन शक्तिमान झोत भट्ट्या तयार करण्यांत आल्या असून, त्या नुकत्याच मुंबई बंदराकडे रवाना करण्यांत आल्या. ह्या भट्ट्यांतून एका घाण्याला ५०० टनापर्यंत पोलाद निर्माण करतां येईल. सध्यांच्या भट्ट्यांत सुमारें २५० टनांच्या उत्पादनाची व्यवस्था आहे.

**कंत्राटदारांना अर्धचंद्र**—पंजाब सरकारनें आपली सार्वजनिक बांधकामें ह्यापुढें कंत्राटदारामार्फत करवून घ्यावयाचीं नाहींत असें ठरविलें आहे. हीं कामें सरकार संबंधित खात्यामार्फत करवून घेणार आहे. तथापि, कामावर लागणारा मजूरवर्ग कंत्राटदारामार्फतच भरती करण्यांत येणार आहे. ह्या पद्धतीनें सार्वजनिक बांधकामें अधिक सचोटीनें, कार्यक्षमतेनें आणि लवकर पार पाडण्यांत येतील अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. त्यामुळें मधला दलालांचा वर्गहि नाहींसा होईल.

**बोटीवर गहूं चढविण्यास विरोध**—रशिआनें अमेरिकेकडून गहूं खरेदी केला. त्यापैकीं निम्मा गहूं अमेरिकन बोटींनीं रशिआत नेण्यांत यावा असें ठरलें होतें. परंतु इतक्या पुरेशा अमेरिकन बोटी मिळत नसल्यानें इतर देशांच्या बोटींनें तो नेण्यांत येणार आहे. करारांतील गहूं-वाहतुकीच्या अटी न पाळल्यास अमेरिकन गोदी कामगार परदेशीय बोटींवर गहूं चढविणार नाहींत, अशी सूचना त्यांच्यातर्फे अमेरिकेच्या व्यापारखात्याला देण्यांत आली आहे. व्यापारखातें शक्य तितक्या अधिक अमेरिकन बोटी मिळविण्याच्या खटपटींत आहे.

**चीनला शांततेची आस ?**—चीनचे परराष्ट्रमंत्री चौ-एन-लाय आफ्रिकेचा दौरा पुरा करून पीकिंगला परत गेले आहेत. आफ्रिकेमधील बऱ्याच देशांना भारत-चीन सीमा तंट्यांतील भारताची बाजू पटल्याचें त्यांना अनुभवास आलें. चीननें भारतावर हल्ला करून मोठी घोडचूक केली असाहि सूर कांहीं देशांत त्यांना ऐकावयास मिळाला. परिणामीं, सीमातंटा मिटविण्यासाठीं भारताबरोबर बोलणीं चालू करण्यास ते फार उत्सुक आहेत, अशी वार्ता आहे.

**संस्थानिकांच्या खाजगी जमिनीवर कर**—ओरिसा सरकारनें राज्यांतील विलीन झालेल्या संस्थानिकांच्या खाजगी मालकीच्या जमिनीवर कर बसविणारा कायदा १९५८ सालीं केला होता. हा कायदा घटनेच्या १४ व्या कलमाप्रमाणें पक्षपाती असल्यानें तो रद्द करावा अशी मागणी दोन संस्थानिकांतर्फे करण्यांत आली होती. भारताच्या सुप्रीम कोर्टानें संबंधित कायदा अवैध ठरविण्याचे दोन्ही अर्ज नामंजूर केले आहेत. अर्जदारांनीं कायदा त्यांच्याविरुद्ध पक्षपात करणारा आहे हें सिद्ध केलें नाहीं असें कोर्टाचें म्हणणें आहे.

**अंकलेश्वर येथील तेलाची किंमत**—गुजरातमधील अंकलेश्वर ह्या तेलखाणीच्या विभागांतून आतांपर्यंत ८ कोटी रुपयांच्या अशुद्ध तेलाचा उपसा करण्यांत आला आणि ते तेलशुद्धीच्या कारखान्यांकडे रवाना करण्यांत आलें. ह्या भागांतील तेलाच्या विहिरी खणण्यासाठीं जी यंत्रसामग्री बसविण्यांत आली आहे तिच्या किंमतीपेक्षाहि अधिक एवढी ही रक्कम आहे. तेल आणि नैसर्गिक वायु मंडळ आतां नर्मदा नदीच्या मुखाशीं असलेल्या एका बेटांत तेलाचा शोध करणार आहे. संशोधनासाठीं हेलिकॉप्टरची मदत घ्यावी लागेल.

**जपानी स्त्रियांची मोहीम**—जपानमधील स्त्रियांच्या मध्यवर्ती संघटनेनें धूम्रपानाविरुद्ध देशव्यापी मोहीम सुरू करण्याचें ठरविलें आहे. जपानमध्यें एका कॉर्पोरेशनकडे सिगारेटस् तयार करण्याची मक्तेदारी असून तें सरकारी मालकीचें आहे. कॉर्पोरेशन सिगारेट्सच्या जाहिरातीवरच दरसाल १२·५ कोटी येन इतकी प्रचंड रक्कम खर्च करतें. स्त्रियांच्या संघटनेनें अशी सूचना केली आहे कीं, ही सर्व रक्कम सार्वजनिक आरोग्याच्या कामीं खर्च करण्यांत यावी. फुप्फुसांतील कॅन्सरचा रोग हटविण्याच्या कामीं हा पैसा खर्च करण्यांत यावा असें संघटनेचें मत आहे.

### रेल्वेजच्या मालवहातुकींत झालेली सुधारणा

१९६३-६४ सालांत रेल्वेनें केलेल्या मालाच्या वहातुकीचा आढावा घेतला असतां त्यांत सुधारणा झाल्याचें आढळून आलें आहे. चालू आर्थिक वर्षांत रेल्वेनें मिळविलेल्या उत्पन्नाच्या आणि मालाच्या वजनाच्या, अशा दोन्ही दृष्टींनी ही सुधारणा झाली आहे. अलीकडे रेल्वेनें कांहीं नवे मार्ग बांधले असून इतरहि कांहीं कामें पूर्ण केलीं आहेत. त्यामुळें चालू आर्थिक वर्षांत १९-१ कोटी टन मालाची वहातूक करण्याचें उद्दिष्ट रेल्वे गांठूं शकेल असा अंदाज आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत मालाच्या वहातुकीचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे, तें गांठण्यांतहि यश येण्याची शक्यता वाटत आहे. मालाच्या वहातुकीसाठी योग्य वेळीं जरूर तितके मालवाहू डबे उपलब्ध असणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. निदान सध्यां तरी ह्या बाबतींत परिस्थिती समाधानकारक आहे. गेल्या वर्षाच्या एप्रिल महिन्यापासून डिसेंबर महिन्यापर्यंत रेल्वेनें एकूण ४६५·२५ कोटी रुपये मिळविले. त्या मागील वर्षाच्या याच कालांत ४०७·५९ कोटी रुपये उत्पन्न झालें होतें. रेल्वेच्या उत्पन्नांतील हींच प्रवृत्ति मार्च अखेरपर्यंत चालू राहिल्यास रेल्वेच्या अंदाजपत्रकांत ३१ कोटी रुपयांपेक्षाहि अधिक शिल्लक राहील. रेल्वेखात्यानें प्रवाशाच्या परिस्थितीत अधिक सुधारणा करण्याच्या योजना आंखल्या आहेत. त्यांतहि तिसऱ्या वर्गांतील प्रवाशांच्या सुखसोयीकडे अधिक लक्ष देण्यांत येणार आहे. तिसऱ्या व दुसऱ्या वर्गांतील उतारूंची झोपण्याची सोय आणखी कांहीं गाड्यांवर करण्याचा विचार चालू आहे. मालवहातुकीचे डबे आधिक सुलभतेनें मिळूं लागल्यानें त्यांची वांटप करण्याची पद्धत व्यवहारतः बंदच पडलेली आहे. उद्योगधंद्यांच्या कांहीं विभागांत मंदी आल्यामुळें मालाच्या डब्यांच्या मागणीवरील ताण तूर्त कमी झालेला आहे.

---

### बँक कामगारांच्या मागण्या आणि चळवळ

ऑल इंडिया बँक इम्प्लॉईज असोसिएशनचे १३ वें अधिवेशन त्रिवेंद्रम येथें गेल्या आठवड्यांत पार पडलें. त्यानें खालील मागण्या केल्या : ( १ ) पगारांत २०% वाढ, ( २ ) कनिष्ठ वर्गाच्या पगारवाढीच्या गतींत वाढ, ( ३ ) १००% पगारावर प्रॉव्हिडंट फंडाचा आणि ग्रॅच्युइटीचा हिशेब; ( ४ ) ४ था एरिया रद्द करणें, ( ५ ) कंझूमर इंडेक्सची रचना वास्तवतेवर करणें आणि ( ६ ) ९,००० रु. पर्यंतच्या उत्पन्नावरील इन्कम टॅक्सचा जादा सरचार्ज रद्द करणें.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या मागणी-पत्रकावर १० लक्ष सह्या गोळा करून ती मागणी पार्लमेंटला अंदाजपत्रकी अधिवेशनांत सादर करावी असें ठरलें. साठेबाज आणि काळाबाजारवाले ह्यांचे विरूद्ध सरकार कारवाया करीत नाहीं, म्हणून त्याचा निषेध करण्यांत आला.

---


### ६३५ अब्जांत एकदा घडणारी गोष्ट

हॅंबर्ग ( जर्मनी ) येथें ब्रिज खेळणाऱ्या चौघांनीं आपले पत्ते पाहिले, तेव्हां तिघांना एकेका रंगाचीं सर्वच्या सर्व पानें आलीं होतीं असें आढळलें. ६,३५,०१,३५,५९,५९९ वेळां पानें वाटलीं तर एकदा असें घडण्याची शक्यता असते, असें तज्ज्ञांचें मत आहे.

---


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंपस्

१" ते ४" बेल्ट ड्राईव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हॅंड पंपस्, हॅंड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग — सांगली ( महाराष्ट्र )

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
MADHAVNAGAR (S.R.) INDIA

# अर्थ

बुधवार, १९ फेब्रुवारी, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## " कर्जांच्या तारणापेक्षा उद्योगधंद्यांच्या अपेक्षित प्रगतीला महत्त्व द्या "

### स्टेट फि. कॉर्पोरेशन्सच्या कार्याचा आढावा

स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्सच्या कार्याचा आढावा घेऊन सूचना करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें जून, १९६२ मध्यें एक समिति ( वर्किंग ग्रुप ) नेमली होती. बँकेच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स खात्याचे चीफ ऑफिसर श्री. के. सी. मित्रा हे त्या समितीचे चेअरमन होते.

मध्यम आणि लहान उद्योगधंद्यांना चालना देऊन आणि मदत करून औद्योगीकरण घडवून आणण्याच्या दृष्टीनें ह्या कॉर्पोरेशन्सची स्थापना करण्यांत आलेली आहे; १९५१ च्या स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स ॲक्टनें त्यांच्याविषयीं तरतुदी केलेल्या आहेत. ह्या कॉर्पोरेशन्सच्या कामांत वाढ झालेली दिसली तरी अपेक्षेप्रमाणें त्यांचा उपयोग झालेला नाहीं. उद्योगधंद्यांना मदत करण्याला कर्जें देणें, डिबेंचर्स घेणें, शेअर्स व डिबेंचर्स अंडरराइट करणें, अन्य मार्गें कर्जांस हमी घेणें, इत्यादि मार्ग कायद्यानें सांगितलेले असतांना कॉर्पोरेशन्सनीं कर्जें देण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. म्हणून त्यासंबंधीं चौकशी करण्याची गरज निर्माण झाली.

कॉर्पोरेशन्सच्या कामाचा विस्तार त्यांना उपलब्ध असणाऱ्या पैशावर अवलंबून राहणें अपरिहार्य आहे. शेअर भांडवल आणि डिबेंचर्स द्वारां कर्ज, ह्या मार्गेंच मुख्यत: आज कॉर्पोरेशन्सनीं पैशाची तरतूद केलेली आहे. ठेवी आणि गंगाजळी नाममात्रच आहे. कॉर्पोरेशन्सच्या कार्याचा विस्तार करावयाचा असेल, अंडररायटिंगचें आणि शेअर उभारणीला मदत करावयाचें काम करावयाचें असेल, तर नुकसानीला तोंड देण्याची तयारी असावी लागेल. स्वत:च्या भांडवलाचा भक्कम आधार जरूर पडेल.

कॉर्पोरेशन्सच्या शेअर्सच्या मुदलाची आणि डिव्हिडंडची सरकारी हमी असली तरी डिव्हिडंडचा दर आकर्षक नसल्यामुळें त्यांच्या शेअर्सना फारशी मागणी नाहीं. ३ ते ४% डिव्हिडंडचा दर आजच्या परिस्थितींत फारच थोडा आहे. म्हणून हा दर वाढविण्यात यावा असें समितीला वाटतें. सध्यां कॉर्पोरेशन्सना स्वत:च्या वसूल भांडवलाइतक्याच ठेवी स्वीकारतां येतात, त्या दुपटीइतक्या घेतां याव्यात आणि ठेवींच्या पावत्या असाइन करण्याची सोय असावी ( त्याला स्टॅंप ड्यूटी पडूं नये ) असेंहि समितीनें सुचविलें आहे.

कॉर्पोरेशन्सच्या पैशापैकी सुमारें १५·३ कोटी रु. बॉंडसच्या स्वरूपांत उभारण्यांत आलेले आहेत; लाइक इं. कॉर्पोरेशन आणि स्टेट बँक ह्यांनींच त्यांत मुख्यत: गुंतवणूक केलेली आहे. इतरांनाहि हे बॉंडस आकर्षक वाटावे ह्यासाठी कांहींच्या परतफेडीची मुदत अल्प असावी; ह्या बॉंडसच्या तारणावर ला. इं. कॉर्पोरेशन कडून पैसे उभारतां येण्याचीहि व्यवस्था असावी, असें समितीचें म्हणणें आहे. प्रॉव्हिडंट फंडांतील रकमा ह्या बॉंडसमध्यें गुंतविण्यास हरकत नसावी; बॉंडस आणि ठेवींच्या पावत्या ह्या इन्कम टॅक्स कायद्याच्या ११ ( २ ) ( ब ) कलमाखालीं अप्रूव्हड सिक्युरिटीज समजल्या जाव्यात म्हणजे ट्रस्ट्स्नांहि त्यांत पैसे गुंतवितां येतील, अशी समितीची सूचना आहे.

विद्यमान मार्गांनीं कॉर्पोरेशन्सचें आर्थिक बळ कसें वाढवितां येईल ह्याचें हें विवेचन झालें. त्याच्या जोडीला सरकारनें आणि रिझर्व्ह बँकेनें प्रत्यक्षहि मदत द्यावी, कर्जाची व्यवस्था करावी असेंहि समितीनें सुचविलें आहे. नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट ( लॉंग टर्म ऑपरेशन्स ) च्या धर्तीवर रिझर्व्ह बँकेला " नॅशनल इंडस्ट्रिअल क्रेडिट ( लॉंग टर्म ऑपरेशन्स ) फंड " निर्माण करण्याचा विकल्पहि सूचित केलेला आहे.

अशा रीतीनें आर्थिक बळ निर्माण झालें, म्हणजे कॉर्पोरेशन्सना अधिक प्रभावी कार्य करतां येईल; उद्योगधंद्यांच्या शेअर्समध्यें आणि डिबेंचर्समध्यें गुंतवणूक करणें त्यांना शक्य होईल; निदान सुप्रस्थापित उद्योगांच्या शेअर्समध्यें पैसे गुंतविण्यास प्रारंभ करून अनुभव मिळवितां येईल.

सध्यां कॉर्पोरेशन्सनीं दिलेल्या कर्जांची छाननी केली, तर बहुतेक कर्जें साखर, चहा, कोल्ड स्टोरेज आणि कापड ह्या परंपरागत उद्योगांनाच दिलेलीं आढळतात; नव्या उत्पादनाच्या प्रकारांकडे लक्ष दिलें जात नाहीं. पुरेशा तारणाचा अभाव, कर्जविषयक धोरणांत सुरक्षितपणावर फाजील भर, इतर उद्योगधंद्यांची छाननी करण्यास आवश्यक अशा तज्ज्ञांचा स्वत:चे स्टाफमध्यें अभाव, स्वत:च्या कर्जपुरवठ्याला परदेशी हुंडणावळ कांहीं प्रमाणांत लागली तर ती देतां येण्याची अपात्रता, इत्यादि त्याला कारणें असतील.

तारणापेक्षा किफायतशीरपणाच्या संभवाला महत्त्व दिलें गेलें तर लायक उद्योगधंद्यांचा कर्जपुरवठ्याचा मार्ग मोकळा होईल; विशेषत: लायक लोकांनीं चालविण्यास घेतलेल्या, ज्यांना परंपरागत तारण देतां येणार नाहीं अशा उद्योगधंद्यांना कर्जें मिळणें सुलभ होईल. दिलेल्या कर्जाला ' पुरेसें ' तारण असावें, असें सध्यांचा कायदा सांगतो; उद्योगधंद्याच्या अपेक्षित यशाला प्राधान्य दिलें जावें; बोर्डाला ' वाजवी ' वाटेल इतपत कर्जाला संरक्षण मिळालें म्हणजे जास्त तारणाची मागणी करूं नये, अशा प्रकारची दुरुस्ती कायद्यांत केली जावी असें समितीनें सुचविलें आहे. नव्या उद्योगधंद्यांना सल्लामसलत देऊन नव्या उपक्रमांस चालना देण्याचें कामहि कॉर्पोरेशन्सना करतां आलें पाहिजे.

कॉर्पोरेशन्सची आजची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं. उत्पन्नाच्या मानानें करांचा आणि हमी घेतलेल्या डिव्हिडंडचा बोजा फार आहे. डिव्हिडंडला आवश्यक असलेल्या रकमेसाठीं जो नफा लागतो, त्यावर कराची माफी दिली गेली असती तर ही परिस्थिति निर्माण झाली नसती. कराचा बोजा कमी व्हावा ह्या दृष्टीनें समितीनें सूचना केल्या आहेत.

---

## मँगेनीझच्या खनिजाची निर्यात वाढली

भारतामधील मँगेनीझची निर्यात मिनरल्स अँड मेटल्स ट्रेनिंग कॉर्पोरेशनतर्फे करण्यांत येत असते. कॉर्पोरेशनतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें १९६३ च्या एप्रिल ते डिसेंबर ह्या ९ महिन्यांच्या काळांत ४·३८ लाख टन मँगेनीझचें खनिज निर्यात करण्यांत आलें. ह्याच अवधींत खाजगी व्यापाऱ्यांनीं २·८१ लाख टन खनिज निर्यात केलें. म्हणजे ह्या काळांत एकूण ७·१९ लाख टन मँगेनीझची निर्यात करण्यांत आली. चालू वर्षांत मँगेनीझची निर्यात आणखी वाढण्याचाहि संभव दिसत आहे. मँगेनीझच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत ज्या किंमती आहेत त्या मानानें भारताच्या किंमती दर टनामागें ४ ते ५ डॉलर्सनीं अधिक आहेत असा अंदाज आहे. त्यामुळें उत्पादनाच्या खर्चाचा विचार करून त्याची विक्री करतां येत नाहीं. परिणामी ऐनजिनसी बदलाचे करार करून आणि इतर मार्गांनीं निर्यातींत येणारें नुकसान अंशतः भरून काढावें लागतें. सध्यां आंतरराष्ट्रीय बाजारांत खरेदी करणाऱ्यांचा वरचष्मा आहे. त्यामुळें उत्पादनाचा खर्चहि निघण्याची पुष्कळदा मारामार पडते. भारताच्या खाणींत उत्पादन करण्यांत येणाऱ्या मँगेनीझचा उत्पादन-खर्च कमी करण्यांत आला तरच ह्या धंद्याची स्थिति सुधारणें शक्य आहे. त्यासाठीं उत्पादनाच्या खर्चांतील अनेक बाबींची तपासणी करण्यांत आली पाहिजे आणि खाणीच्या मालकांना योग्य ती उत्पादनपद्धति स्वीकारण्याची मुभा देण्यांत आली पाहिजे. मँगेनीझच्या भविष्यकालीन निर्यातीसंबंधीं वाजवी विश्वास वाटला तरच ह्या धंद्यांत अधिक भांडवल गुंतविणें त्यांना इष्ट वाटेल. १९६१ च्या जूनपासून मँगेनीझच्या निर्यातीमुळें मिळणाऱ्या परदेशीय चलनाचा कांहीं हिस्सा खाणीची यंत्रसामग्री आयात करण्यासाठीं वापरण्याची पद्धत अमलांत आलेली आहे.

---

## बांगड्यांच्या निर्यातीला अमेरिकेची बाजारपेठ

प्लॅस्टिकच्या आणि लिनोलिअमच्या वस्तू परदेशीं निर्यात करण्याच्या शक्यतेचा अभ्यास करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या मंडळानें आपले अभ्यासक अमेरिका, ब्रिटन, नायजेरिया व इराक ह्या देशांना पाठविले होते. अभ्यासकांना असें आढळून आलें कीं प्लॅस्टिकच्या बांगड्या अमेरिकेला निर्यात करतां येतील. अर्थात् ही बाजारपेठ मिळविण्यासाठीं बांगड्यांच्या निर्मितींत सुधारणा करावी लागेल. अमेरिकन स्त्रियांना आवडणाऱ्या व त्यांच्या पसंतीला उतरणाऱ्या बांगड्या मुद्दाम तयार कराव्या लागतील. सध्यां देशांत विकल्या जाणाऱ्या सुमार बांगड्या अमेरिकेंत खपणार नाहींत. भारताच्या प्लॅस्टिकच्या बांगड्यांच्या धंद्यानें निर्यातीचें आपलें उद्दिष्ट गांठून ह्याहि पलीकडे मजल मारली आहे. निर्यातीसाठीं १० लाख रुपयांच्या बांगड्यांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. पण १९६३ च्या एप्रिल ते डिसेंबर ह्या ९ महिन्यांच्या कालांतच १३·५ लाख रुपये किंमतीच्या बांगड्या निर्यात् करण्यांत आल्या. येत्या दोन वर्षांत सुमारें १ कोटी रुपयांच्या बांगड्या निर्यात करण्यांत येऊं लागतील असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. सध्यां नायजेरिया हा देश भारताकडून सर्वांत अधिक म्हणजे दरसाल सुमारें ४ लाख रुपये किंमतीच्या बांगड्या घेत असतो. निर्यात मंडळाच्या अभ्यासकांना अमेरिकेंत भारताच्या बांगड्यांबद्दल बरेंच औत्सुक्य दिसून आलें. त्यावरून ह्या बांगड्या अमेरिकेंत खपूं शकतील असा कयास करण्यांत आला आहे. अभ्यासमंडळानें आपल्या दौऱ्यांत ११ लाख रुपये किंमतीच्या बांगड्यांच्या मागण्या नोंदविल्या आहेत. त्यांपैकी १ लाख रुपयांच्या मागण्या अमेरिकेकडून आलेल्या आहेत.

## मृतांच्या शरीरांतील रक्ताचा उपयोग

आधुनिक वैद्यकशास्त्रानें एका माणसाच्या शरीरांतील रक्त आपद्प्रसंगीं दुसऱ्या माणसाच्या शरीरांत घालून त्याचा जीव बचावण्यांत यश मिळवलें आहे. तथापि नुकत्याच मृत झालेल्या माणसांच्या शरीरांतील रक्ताचा उपयोग अशा रीतीनें करण्याचें प्रयोगांत अद्याप विशेष यश आलेलें नव्हतें. परंतु अमेरिकेंतील एका डॉक्टरनें मृत माणसाच्या शरीरांतील रक्ताचा उपयोग करण्यांत यश मिळविलें आहे. ह्या डॉक्टरनें ५ ते ५॥ तासापूर्वी मृत्यु पावलेल्या तीन माणसांच्या शरीरांतील रक्त निरोगी स्वयंसेवकांच्या रक्तांत मिसळण्याचा यशस्वी प्रयोग केला. मरणोत्तर रक्ताचें दान करणाऱ्यांत एकजण ३४ वर्षें वयाचा होता आणि त्याचें जीवन रक्तवाहिन्यांतील अडथळ्यामुळें संपुष्टांत आलेले होतें. दुसऱ्या दोन व्यक्तींपैकी एक १८ वर्षांची मुलगी होती आणि दुसरी व्यक्ति २१ वर्षांचा एक पुरुष होता. ह्या दोन्हींहि व्यक्ती मोटारीच्या अपघातांत दगावलेल्या होत्या. रक्तवाहिन्यांतील अडथळ्यामुळें मृत्यु पावलेल्या माणसाच्या शरीरांतील रक्त मानेंतील शीर तोडून घेण्यांत आलें. परंतु मोटार अपघातांत निधन पावलेल्या व्यक्तींच्या शरीरांतील रक्त अशा रीतीनें घेतां येणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांचें रक्त थेट हृदयापासूनच घेण्यांत आलें. रक्तांतरासंबंधीं संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मतानें हृदयापासून रक्त घेण्याची पद्धत अधिक सोपी आहे. कारण ह्या पद्धतींत रक्तांतर करण्यासाठीं मृताचें शरीर उलटें करावें लागत नाहीं. मृताच्या शरीरांतील रक्ताचा जिवंत माणसासाठी उपयोग करण्याचें हें तंत्र रणांगणावर अगर नागरी जीवनांत एखादी घोर आपत्ति ओढवल्यास विशेष उपयोगी पडण्यासारखें आहे असें संशोधकांचें मत आहे. मृताच्या शरीरांतील रक्ताचा उपयोग करण्याचे प्रयोग रशिआंतहि करण्यांत येत आहेत. वैद्यकीय शास्त्रांतील प्रगतीमधील हा एक नवीच टप्पा म्हणावा लागेल.

---

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील रबराचें उत्पादन

नियोजन समितीनें नेमलेल्या रबराच्या अभ्यासगटाची बैठक कन्याकुमारी येथें भरविण्यांत आली होती. रबराच्या उत्पादनाबाबतची तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील परिस्थिति आणि चौथ्या योजनेंतील संभाव्य उत्पादन ह्याविषयीं बैठकींत विचारविनिमय करण्यांत आला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत नैसर्गिक रबराचें उत्पादन ४५ हजार टन करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलेलें आहे. प्रत्यक्ष उत्पादन मात्र ५ हजार टनांनीं अधिक होण्याची शक्यता आहे. अभ्यासगटाला असें आढळून आलें कीं, रबराच्या उत्पादनवाढीचा कार्यक्रम एकंदरीनें समाधानकारक प्रगति करीत आहे. तथापि, रबराच्या झाडांची पुन्हां लागवड करण्याच्या दृष्टीनें जी योजना आखण्यांत आली होती, ती नीटशी अमलांत आणली गेलेली नाहीं. १९६० मध्यें मंजूर करण्यांत आलेल्या मदतयोजनेंत दर एकरामागें १ हजार रुपयांची मदत देऊं करण्यांत आली होती. योजनेप्रमाणें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ४८ हजार एकर जमिनींत रबराची लागवड पुन्हां करण्यांत यावी अशी अपेक्षा होती. परंतु पहिल्या तीन वर्षांत सुमारें २५ हजार एकरांतच लागवड करण्यांत आलेली आहे. रबराचें उत्पादन त्वरित वाढावें म्हणून रबराची किंमत वाजवी ठेवण्यांत आलेली आहे. भारताला रबराबाबत स्वयंपूर्णता प्राप्त करतां आली तर ती हवी आहे. देशांतर्गत उत्पादन अपुरें असल्यानें अजून कांहीं वर्षें तरी रबराची आयात करण्याशिवाय उपाय नाहीं. भारत मलायाकडून दरसाल सुमारें २० ते २५ हजार टन रबर आयात करतो. देशांतील रबराची गरज वाढत चाललेली असतांनासुद्धां आयातींत वाढ झालेली नाहीं.

## लठ्ठपणा घालविण्यासाठी उपासाचा उपाय

शरीरावर वाढलेली प्रमाणाबाहेरील चरबी कमी करण्यासाठी उपवासाचा अवलंब करण्यांत येतो. वृद्धावस्थेंत वजन फार असल्यास हृदयावर ताण पडतो म्हणून वार्धक्यापर्यंत पोंचलेले लठ्ठ लोक उपवासाची कास धरतात, तर मध्यमवयीन सुखवस्तु यौवना आपली आकृति प्रमाणबद्ध ठेवण्यासाठी अन्नत्याग करतात. एतावता शारीरिक स्थूलता कोणालाच हितावह ठरत नाहीं. अमेरिकेंतील एका अभ्यासगटानें स्थूलपणा कमी करण्यासाठीं करण्यांत येणाऱ्या उपवासांची शास्त्रीय चिकित्सा केली आहे. ह्या चिकित्सेंत असें आढळून आलें कीं, चरबी कमी करण्यासाठीं उपवास करणाऱ्यांना कमी रक्तदाबापासून रक्तक्षयापर्यंत अनेक प्रकारच्या व्याधी निदान तात्पुरत्या तरी जडतात. अभ्यासगटानें केलेल्या पाहाणींत ३२ पासून ७१ वर्षें वयापर्यंतच्या व्यक्तींचा समावेश करण्यांत आलेला होता. त्यांचीं वजनें २४० पौंडांपासून २६० पौंडांपर्यंत होतीं. उपवास करूं लागल्यापासून ह्यांतील बहुतेक व्यक्तींचें वजन दररोज सरासरी एक पौंडापेक्षा थोडें कमी होत गेलें. एका स्त्रीचें वजन मात्र ११७ दिवसांत ११६ पौंड घटलें. तरुण वयांतील लोकांवर उपवासाच्या प्रयोगाचा फारसा वाईट परिणाम झाला नाहीं. वयस्कर माणसांच्या प्रकृतीवर मात्र उपवासाचा कांहींसा अयोग्य परिणाम झाला. कित्येक दिवसपर्यंत पोटांत अन्नाचा कण न घेतांहि ह्या वजनदार रोग्यांची परिस्थिति बिघडली नाहीं. दुसरे म्हणजे दीर्घ उपवासाची मात्रा एकदा घेतल्यावर नंतर ह्या रोग्यांनीं पोटास तडस लागेपर्यंत कधींहि भोजन केलें नाहीं. ह्या उपवासाच्या प्रयोगांत सहकार्य करणाऱ्या रोग्यांनीं कित्येक दिवस फक्त पाणी आणि जीवनसत्त्वें ह्यांच्या सेवनानें काढले.

## कोलंबो योजनेतर्फे आर्थिक पाहणी

१९६२–६३ मधील भारताच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं कोलंबो योजनेतर्फे पाहणी करण्यांत आली आहे. ह्या सालच्या आक्टोबर महिन्यांत भारतावर चीनचें आक्रमण झाल्यानें सरकारला आपल्या सर्व अर्थव्यवस्थेची दिशा युद्धसन्मुख करावी लागली. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या ह्या दुसऱ्या वर्षांत चीनच्या हल्ल्यामुळें नवेंच पर्व निर्माण झालेलें आहे. साधनसंपत्तीचा वापर ठरल्याप्रमाणें विकासाचीं कामें करण्यासाठी करावाच लागेल. परंतु त्याशिवाय देशाच्या संरक्षण व्यवस्थेचीहि बांधणी करावी लागेल. आगामी कालांत देशांतील उत्पादन किती वाढतें आणि परदेशीय साह्य किती मिळतें, ह्या दोन गोष्टींवर उद्योगधंद्यांतील उत्पादन चालूं ठेवणें अवलंबून आहे असें पाहणींत नमूद करण्यांत आलेलें आहे.

## चौथ्या पंचवार्षिक योजनेसाठी रशियाची मदत

भारताच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेसाठी द्यावयाच्या मदतीची तपशीलवार आंखणी रशिया करीत असल्याची वार्ता आहे. रशियानें आपल्या स्वतःच्या चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतच ही मदत देण्याची तरतूद केलेली आहे. रशियाकडून जी आणखी मदत मिळणार आहे ती मुख्यत्वेंकरून भारतामधील भारी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी आणि विस्तारासाठी मिळणार आहे. हिंदला आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी बनवावयाचें असेल तर ह्या उद्योगधंद्याचा पाया भक्कम रीतीनें घालण्यांत आला पाहिजे असें रशियन तज्ज्ञांचें मत आहे. रशियाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतींत पहिल्यापासूनच एक सूत्र दिसून येतें. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील मूलभूत उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणण्यासाठींच मुख्यतः ही मदत देण्यांत आलेली आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेंत भारताला देण्यांत येणारी मदतहि सार्वजनिक विभागांतील मूलभूत उद्योगधंद्यांना अधिक बळकट करण्यासाठींच देण्यांत येणार आहे. रशिअन अर्थशास्त्रज्ञांच्या मतानें भारताचें मागासलेपण आणि खालच्या पातळीवरील उत्पादनक्षमता ही शास्त्रीय आणि तांत्रिक उत्पादनपद्धतीचा अवलंब केल्याशिवाय सुधारणेच्या मार्गावर जाणार नाहीं. त्यासाठी भारताच्या उद्योगधंद्यांची आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें पुनर्घटना करणें अतिशय आवश्यक आहे. रांची आणि दुर्गापूर ह्या ठिकाणीं सरकारी मालकीचे दोन मोठे भारी एंजिनिअरिंगचे कारखाने रशिआ आणि झेकोस्लाव्हाकिओ ह्यांच्या सहकार्यानें बांधण्यांत आले आहेत.

## वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाची आयात

कॅनडांतील एक कंपनी आणि भारताचें स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांच्या दरम्यान करण्यांत आलेल्या कराराप्रमाणें भारत कॅनडाकडून १९६४–६५ सालांत २५ हजार टन वृत्तपत्रांना लागणारा कागद आयात करणार आहे. ह्या कागदाची किंमत १·५ कोटी रुपये होईल. १९६३–६४ सालीं ह्याच कंपनीबरोबर ३१ हजार टन कागद आयात करण्याचा करार करण्यांत आला होता. ह्या कराराप्रमाणें व्हावयाचा पुरवठा आतां पूर्ण होत आलेला आहे. भारताला सुमारें ९० हजार टन कागदाची आयात दरसाल करावी लागते. आयात मुख्यतः कॅनडा, रशिया, पोलंड, स्वीडन, आणि नॉर्वे ह्या देशांकडून करण्यांत येते. कुलु खोऱ्यांत कागद तयार करण्याचा कारखाना काढण्याच्या शक्यतेची तज्ज्ञांकडून पहाणी करविण्यांत येत आहे. संकल्पित कारखान्यासाठीं ५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. दरसाल ५० हजार ते ७० हजार टन कागदाचें उत्पादन कारखान्यांत करण्यांत येईल.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७१९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — „ „ ३॥ „
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — „ „ ४½ „

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## लाखेच्या निर्यातीबाबत थायलँडचें सहकार्य

मॅनिला येथें नुकत्याच भरविण्यांत आलेल्या आशिआई आर्थिक परिषदेंत आशिआंतील देशांनीं आपल्या निर्यात व्यापाराबद्दल सहकार्याचें धोरण स्वीकारावें असें सुचविण्यांत आलें होतें. आशिआंतील बहुसंख्य देश मागासलेले असल्यानें ते पुढारलेल्या पाश्चात्य देशांना प्राथमिक स्वरूपाचा कच्चा मालच मोठ्या प्रमाणावर पुरवतात. त्यांनीं हा पुरवठा करतांना आपसांत स्पर्धा करणें नेहमींच घातक ठरतें. निर्यात व्यापारांतील एका वस्तूबद्दल भारत आणि थायलँड ह्यांनीं सहकार्य करण्याचें ठरविलें आहे. ही वस्तु म्हणजे लाख. कांहीं वर्षांपूर्वी भारत हा एकच देश जगाला लाखेचा पुरवठा करणारा होता. पण अलीकडे थायलँडहि लाखेची निर्यात करूं लागल्यानें भारताची मक्तेदारी संपुष्टांत आलेली आहे. लाखेच्या निर्यात व्यापारांत प्रतिस्पर्धी निर्माण झाल्यामुळें परदेशीय बाजारपेठांत आपलें स्थान टिकवून धरणें भारताला अवघड जाऊं लागलें. विशेषत: अमेरिकेंत भारताच्या लाखेला चांगलाच धोका निर्माण झाला. ही परिस्थिति सुधारण्यासाठी भारत सरकारनें दोन महिन्यापूर्वी थायलँडला एक प्रतिनिधी मंडळ पाठवून दोन्ही देशांच्या हिताच्या दृष्टीनें लाखेच्या किमती टिकवून धरण्याची जरूरी प्रतिपादन केली. भारतानें केलेल्या ह्या व्यापारी शिष्टाईचा परिणाम होऊन थायलँडच्या लाखेच्या किमती चढून भारताच्या लाखेच्या किंमतीच्या जवळ आल्या आहेत. पाश्चात्य देशांना विशेषत: अमेरिकेला लाखेचा पुरवठा मुख्यत: थायलँड आणि भारत ह्या दोनच देशांकडून होतो. अर्थातच लाखेच्या किमती पडूं न देण्यांत उभयतां देशांचें हित आहे. १९६२–६३ सालांत भारतानें ४·८ कोटी रुपये किमतीची लाख परदेशांत निर्यात केली आहे. आशिआंतील देशांनीं परस्परांशीं आर्थिक सहकार्य करण्याचें तत्त्व मॅनिलामध्यें मान्य करण्यांत आलें होतें. परंतु तें प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याची पहिली संधि भारत आणि थायलँड ह्या देशांनीं साधली आहे.

---

## हृषीकेशजवळील औषधाचा कारखाना

हृषीकेशजवळ वीरभद्र ह्या ठिकाणीं रशिआच्या मदतीनें काढण्यांत येत असलेला औषधांचा कारखाना आशियांतील सर्वांत मोठा ठरण्याची शक्यता आहे. १९६५ मध्यें कारखान्यांत औषधांच्या निर्मितीस प्रारंभ होईल. त्यांत दरसाल २०० अँटीबायॉटिक औषधें तयार करण्यांत येतील. रशिआंतील ह्या प्रकारचीं औषधें तयार करण्याच्या कारखान्यांतील वार्षिक उत्पादन२००टनांचें आहे. भारतांत रशिआच्या मदतीनें उभारण्यांत यावयाच्या चार मोठ्या कारखान्यांपैकी हा एक आहे. रशिआ कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविणार असून तांत्रिक साह्यहि देणार आहे. त्याशिवाय भारतीय तंत्रज्ञांना शिकविण्याचें कामहि रशिआ करणार आहे. कारखान्याच्या उभारणीस २२ कोटी रुपये खर्च येणार असून त्यामुळें दरसाल ३ कोटी रुपयांचें परदेशीय चलन वाचेल. कारखान्यामुळें ४,००० कामगारांना रोजगार मिळेल.

---

## बेळगांव बँकेची गुळेदगुड्ड शाखा सुरू झाली

दि बेळगांव बँक लि. च्या गुळेदगुड्ड ( जि. विजापूर ) शाखेचें उद्घाटन रविवार, दि. १६ फेब्रुवारी, १९६४ रोजीं झालें. त्या दिवशीं सकाळीं १० ते दुपारीं १ पर्यंत पानसुपारी-समारंभ झाला.

---

## विमानांच्या अपघाताबद्दल संशोधन

जगभर विमानांची वाहतूक वाढत चालल्यामुळें अपघातांचें प्रमाणहि थोडेंबहुत वाढणें अपरिहार्य आहे. प्रवासी विमानांना होणाऱ्या अपघातांपैकी दोनतृतीयांश अपघात विमान हवेंत तरंगू लागण्याच्या वेळीं अगर ते उतरण्याच्या वेळीं होतात असें आढळून आलें आहे. परंतु विमानें चढण्या-उतरण्याच्या वेळीं ती कशी काय वावरतात ह्यासंबंधीं आंकडेवार माहिती अद्याप कोठेंच जमविण्यांत आलेली नाहीं. आधुनिक साधनसामग्रीच्या साह्यानें ही माहिती जमविण्यांत आल्यास ती फार उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे. ह्यासंबंधीं ब्रिटिश सरकारच्या हवाई खात्यानें पुढाकार घेण्याचें ठरविलें आहे. विमानांच्या चढण्या-उतरण्याचा अभ्यास करणारी एक स्वतंत्र संघटनाच उभारण्यांत आलेली आहे. ह्या संघटनेंत १५ शास्त्रज्ञ असून तिच्या खर्चासाठी दरसाल ६५ हजार पौंड मंजूर करण्यांत येणार आहेत. संघटनेच्या उपकरणांत खास राडर यंत्रणा आणि कॅमेरे ह्यांचा समावेश आहे. ह्या उपकरणांची किंमत २,५०,००० पौंड आहे. विमानें उतरतांना धावपट्टीवर ती प्रथम कोणत्या जागीं टेकतात, त्या वेळीं त्यांचा वेग काय असतो, कोणत्या गतीनें विमानें तळावर उतरतात, इत्यादि अनेक बारीकसारीक माहिती वरील उपकरणांच्या साह्यानें संघटना जमविणार आहे. दरसाल विमानांचे ३,००० चढ–उतार संघटनेतर्फे अभ्यासण्यांत येणार आहेत. संघटना लवकरच उभारण्यांत येणार असली तरी तिच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात ह्या वर्षअखेर होणार आहे. त्यानंतर जमविलेल्या माहितीच्या आधारें अहवाल सादर करण्यास आणखी एक वर्ष लागण्याचा संभव आहे. सध्यां विमानें चढण्या-उतरण्याच्या हालचालींची यांत्रिक नोंद करण्याची कांहींशीं सोय अमलीं तरी अपघातांच्या प्रसंगीं ह्या माहितीचा फारसा उपयोग होत नाहीं असें तज्ज्ञ म्हणतात. त्या दृष्टीनें ब्रिटिश सरकारनें केलेला उपक्रम फार उपयुक्त ठरणार आहे.

---

## छोट्या यंत्रचलित नांगरांचा कारखाना

डिझेल तेलावर चालणाऱ्या छोट्या यंत्रचलित नांगरांचा एक कारखाना बंगलोरपासून २८ मैलांवर असलेल्या गांवीं काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठी जपानचें सहकार्य लाभलें आहे. कारखाना खाजगी मालकीच्या विभागाचा असेल आणि त्याचें भांडवल १ कोटी रुपयांचें असेल. जपानमधून आयात करण्यांत आलेले सुटे भाग जुळवून नांगर तयार करण्याचें काम कारखान्याच्या पहिल्या अवस्थेंत हातीं घेण्यांत येईल. ५ वर्षांनंतर कारखाना स्वतंत्र रीतीनें उत्पादन करूं लागेल. उभारणीच्या प्राथमिक कामासाठी ४० लाख रुपये लागणार आहेत. कारखान्यांत पूर्ण उत्पादन होऊं लागलें म्हणजे दरसाल ३ हजार नांगर तयार होऊं लागतील. तयार होणाऱ्या छोट्या नांगराचा विशेष असा कीं, तो नांगर ढेकळें फोडणें आणि माती समपातळीवर आणणें ह्या क्रिया एकटाच करूं शकेल.

---

## दि यूनिट ट्रस्ट ऑफ इंडिया

युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया ॲक्ट, १९६३ च्या अन्वयें स्थापन झालेल्या यूनिट ट्रस्टची स्थापना १ फेब्रुवारी १९६४ रोजीं झाली असून त्याचे चेअरमन श्री. आर. एस. भट्ट हे आहेत. रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार श्री. व्ही. जी. पेंढारकर हे एक्झिक्यूटिव्ह ट्रस्टी आहेत. ट्रस्टची कचेरी मुंबई येथें अमर बिल्डिंग, फिरोजशहा मेहता रोड, येथें आहे.

## भारतामधील प्रमुख नद्या जोडण्याची योजना

भौगोलिक विस्ताराच्या दृष्टीनें अवाढव्य असलेल्या देशांना वाहतुकीसाठी अनेक प्रकारच्या साधनांचा उपयोग करून घ्यावा लागतो. भारताच्या किनाऱ्यांनीं बोटींच्या साह्यानें वाहतूक करण्यांत येत असली तरी राज्यांतर्गत वाहतुकीसाठी रेल्वेमार्ग आणि रस्ते ह्यांचाच प्रामुख्यानें आश्रय घ्यावा लागतो. खुष्कीची वाहतूक ही अन्य मार्ग नसल्यास करावीच लागते. परंतु अंतर्गत जलवाहतूक करतां येण्यासारखी असल्यास ती स्वस्त पडते असा अनुभव आहे. त्या दृष्टीनें मध्यवर्ती सरकारचे पाणीपुरवठा व वीज मंत्री श्री. के. एल. राव ह्यांनीं निर्देश केलेली योजना अतिशय महत्त्वाची आहे. श्री. राव ह्यांनीं सांगितलेल्या माहितीप्रमाणें भारत सरकार ब्रह्मपुत्रा नदी फराक्का ह्या ठिकाणीं गंगा नदीला जोडण्याच्या आणि गंगा नदी नर्मदा नदीला जोडण्याच्या एका योजनेचा विचार करीत आहे. भारतामधील प्रमुख नद्या जोडण्याच्या योजनेचा विचार पंचवीस-तीस वर्षांपूर्वी सर. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनीं बोलून दाखविला होता. नद्या जोडण्याच्या योजनेसाठी सुमारें ५० ते ६० कोटी रुपये खर्च लागेल आणि ती पूर्ण होण्यास ६ ते ७ वर्षांचा अवधी लागेल असा अंदाज आहे. अर्थात् सर्व योजना एकदम हातीं न घेतां ती टप्प्याटप्प्यानें अमलांत आणावी लागेल. ब्रह्मपुत्रा आणि गंगा ह्या नद्या जोडण्याचें कार्य तिस्ता नदीच्या साह्यानें करण्यांत येणार असून गंगेच्या एका उपनदीच्या प्रवाहाचा फायदा घेऊन ती नर्मदा नदीला जोडण्यांत येणार आहे. नर्मदा नदी वहातुकीस योग्य करण्यासाठी कांहीं अडचणींचा परिहार करावा लागणार आहे. ह्या कामीं तांत्रिक सल्ला मिळविण्यासाठी भारत सरकारनें कांहीं फ्रेंच एंजिनिअर्सना अवाहन केले आहे. प्रमुख नद्या जोडण्याची ही योजना अमलांत आल्यावर राज्यांतर्गत वाहतुकीचें एक महत्त्वाचें व स्वस्त साधन हातीं येईल.

## जयंती शिपिंग कंपनीची वाहतूक

जयंती शिपिंग कंपनीच्या मोठ्या बोटींनीं लोखंडाच्या खनिजाची मार्मगोवा बंदरांतून वाहतूक करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या बंदरांतून लोखंडाच्या खनिजाची वाहतूक करणारी ही पहिलीच हिंदी बोट आहे. गेल्या वर्षीं कंपनीच्या बोटींनीं मालाची वाहतूक करून सुमारें २ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळविलें. कंपनीच्या बोटींवर १,४०० खलाशी काम करीत असून ते सर्व हिंदी आहेत. युरोपांतील अनेक देशांच्या बंदरांना कंपनीच्या बोटी जातात. हिंदी बोटवाहतूक स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें कंपनीचे सर्व नौकर हिंदी असण्याचें विशेष महत्त्व आहे. त्यामुळें परदेशी बोट वाहतूक कंपन्यांशीं स्पर्धा करणें सुलभ होतें. जयंती शिपिंग कंपनी लोखंडाच्या खनिजाशिवाय साखर परदेशीं वाहतूक नेण्याच्या कामींहि कामगिरी बजावत आहे.

## इंग्लिश खाडीखालून रेल्वेमार्ग

इंग्लिश खाडीखालून रेल्वेचा मार्ग बांधून दोन्ही देशांना जोडण्याचा निर्णय ब्रिटिश व फ्रेंच सरकारांनीं घेतला आहे. ह्या प्रश्नाची कायदेशीर व आर्थिक बाजू लवकरच तपासण्यांत येणार आहे. रेल्वेसाठी बांधण्यांत येणारा हा बोगदा ५० किलो मीटर म्हणजे सुमारें ३२ मैल लांबीचा होईल. फ्रान्सच्या किनाऱ्यावरील एक गांव ह्या बोगद्यानें डोव्हरशीं जोडले जाईल. रेल्वेमार्ग तयार होण्यास ६ वर्षांचा अवधि लागेल आणि त्यासाठी १४·३ कोटी पौंड खर्च होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. पश्चिम युरोपमधील राजकीय वादळांपासून अलिप्त राहण्याच्या कामीं ब्रिटनला आजवर ह्या खाडीचा चांगला उपयोग झालेला आहे.

## आर्थिक नियोजनांत साक्षरतेचें महत्त्व

नियोजन समितीचे एक सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही राव ह्यांनीं आपल्या एका व्याख्यानांत आर्थिक नियोजन यशस्वी होण्यासाठी लोकांच्या साक्षरतेचें किती महत्त्व आहे तें विशद केलें आहे. आर्थिक नियोजनांत माणसांचें महत्त्व ह्या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले कीं, आर्थिक नियोजन फलदायी होण्यासाठी लोक झपाट्यानें साक्षर झाले पाहिजेत आणि त्यांच्या देशभक्तीच्या भावनेलाहि उत्कटता आली पाहिजे. जपान, स्वीडन आणि डेनमार्क ह्या देशांना नैसर्गिक साधन-संपत्तीचा फार मोठा लाभ झालेला आहे, असें नाहीं. तरीसुद्धां ह्या देशांनीं आपला आर्थिक विकास साधण्याचें काम बऱ्याच प्रमाणांत यशस्वी केलेलें आहे. ह्याचें कारण त्यांनीं साक्षरताप्रसाराला दिलेलें महत्त्व हें आहे. भारतांत मात्र परिस्थिति अगदीं निराळी आहे. येथील शेतकऱ्यांच्या अनेक मुलांना शिक्षण मध्येंच सोडून द्यावें लागतें. कारण कुटुंबाचें उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना शेतावर कामाला जावें लागतें. ह्या मुलांना शिक्षण पूर्ण करण्याची संधि मिळण्यासाठी त्यांच्या शाळेचे तास सोयीस्कर ठेवण्यांत आले पाहिजेत. सध्यांचा निरक्षर शेतकरी साक्षर झाला आणि त्याला हिशोब ठेवण्याचें ज्ञान झालें म्हणजे उत्पादनांत वाढ झाल्याखेरीज राहणार नाहीं. स्वतःच्या उद्योगांत काम करणारे लोक त्यांच्या कामाशीं जितके एकरूप होतात तितके दुसऱ्याकडे कामाला जाणारे लोक होत नाहींत. भारतामधील राज्यसरकारे आणि मध्यवर्ती सरकार मिळून सुमारें ३ ते ४ कोटी लोकांना रोजगार देतात; ह्या लोकांनीं त्यांच्या कामाशीं एकरूप होण्याचे उपाय शोधून काढले पाहिजेत. त्याचप्रमाणें प्रत्येक माणसाला त्याच्या कर्तृत्वाला साजेसें काम देण्यांत आलें पाहिजे. सरकारच्या नौकरींत असणाऱ्यांच्या बाबतींत ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यांत आलें पाहिजे.

## वधू-वरांचें विवाहाच्या वेळचें वय

उत्तर भारतांतील हिंदी भाषिक मुलांचें व मुलींचें विवाहाच्या वेळचें सरासरी वय देशाच्या इतर भागांतील तत्सम वयापेक्षा कमी असतें. सबंध देशाची सरासरी, मुलें २२·३२ वर्षें आणि मुली १६·१० वर्षें, अशी आहे. म्हणजे, बोहल्यावर चढणारा मुलगा सरासरीनें २२ वर्षें, ४ महिन्यांचा असतो, तर मुलगी १६ वर्षें १ महिन्यांची असते. मद्रास राज्यांतील वर सर्वांत वयस्क (२६·४२ वर्षें) असतो; त्याखालोखाल केरळांतला वर (२६·३३ वर्षें) येतो. सर्वांत वयस्क वधू (१९·२५ वर्षें) केरळांत आढळते. मध्यप्रदेशांतील वराचें आणि वधूचें वय सबंध भारतांत कमी असतें; त्यांच्या वयांची सरासरी अनुक्रमें १८·२६ वर्षें आणि १३·९९ वर्षें अशी आहे. महाराष्ट्रांतील वधू-वरांचें विवाहाच्या वेळचें वय सरासरीनें राष्ट्रीय सरासरीइतकेंच आहे. महाराष्ट्रांतला वर २२ वर्षांचा असतो आणि वधू १६ वर्षांची असते.

## झेकोस्लोव्हाकिआ ध्वनिक्षेपक देऊ शकेल

भारतावर चीनचें आक्रमण झाल्यापासून रेडिओवरील प्रचारांत चीननें आघाडी मारलेली आहे. चीनच्या ह्या आघाडीला तोंड देण्यासाठी भारताला प्रभावी ध्वनिक्षेपकाची जरूरी आहे. परंतु असा शक्तिमान ध्वनिक्षेपक फक्त अमेरिकाच पुरवू शकेल. ह्या बाबतींत भारत सरकारनें केलेली खटपट यशस्वी झाली नाहीं. आतां ५०० किलोवॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक झेकोस्लोव्हाकिआकडून मिळण्याची शक्यता आहे. पेकिंग रेडिओ अशाच ध्वनिक्षेपकाचा उपयोग करीत आहे. झेकोस्लोव्हाकिआकडून असा ध्वनिक्षेपक विकत घेण्यासाठी ८० लाख रुपयांचें परदेशीय चलन लागणार आहे. भारताचें माहिती व नभोवाणी खातें अर्थखात्याकडून जरूर ते परदेशीय चलन मिळविण्याच्या खटपटींत आहे.

## लोकरीचें उत्पादन वाढविण्याची योजना


राजस्थान सरकारनें मेंढ्या पाळण्याच्या व लोकर उत्पादन करण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्यासाठी एक योजना मुक्रर केली आहे. ह्या योजनेला सुमारें २७६ लाख रुपये खर्च येणार आहे. मेंढ्यांच्या गेल्या शिरगणतींतील आकडे जमेस धरून राज्याचे १४ जिल्हे पाडण्यांत येणार आहेत. सामान्यपणें जमीनमहसुलासाठी जे विभाग पाडण्यांत आले आहेत त्यांच्याशीं जुळते असे नवीन जिल्हे असतील, परंतु जरूर पडल्यास अशा दोनतीन विभागांचा एक जिल्हा पाडण्यांत येईल. राज्यांत भारतांत सर्वांत अधिक लोकरीची पैदास करण्यांत येते. देशाच्या लोकरीच्या एकूण उत्पादनापैकी एक तृतीयांश उत्पादन राजस्थानांत करण्यांत येतें. राज्यांतील मेंढ्यांची संख्या ७५ लाखांच्या आसपास असून त्यांच्यापासून दरसाल २·९ कोटी पौंड लोकर निर्माण करण्यांत येते. भारतामधील लोकरीचें उत्पादन ७·२ कोटी पौंडांच्या जवळपास आहे. त्यांपैकी ३·६ कोटी पौंड लोकर गालिचे तयार करण्यासाठी परदेशांत निर्यात करण्यांत येते. परदेशीय चलन मिळविण्याच्या दृष्टीनें लोकरीच्या उत्पादनाला महत्त्व आहेच; पण भारताच्या उत्तर सरहद्दीवरील आक्रमणाला तोंड देत असलेल्या हिंदी लष्कराच्या गरजा भागविण्याच्या कामींहि राजस्थानामधील लोकरीच्या धंद्याला प्रासंगिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे. १९५९-६० सालांत लोकरीच्या व मेंढ्यांच्या निर्यातीमुळें भारताला २६·६ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली. राजस्थान सरकारनें लोकरीच्या धंद्याच्या विकासासाठी आखलेला कार्यक्रम अमलांत आल्यास लोकरीचें उत्पादन करणारे आणि तिचा वापर करणारे ग्राहक ह्या दोघांचाहि फायदा होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

## ग्रामदान खेड्यांना परदेशीय मदत

दारिद्र्याचें उच्चाटन करण्यासाठी परिश्रम करणारी एक संघटना ब्रिटनमध्यें स्थापन झालेली आहे. संघटनेनें भारतामधील भूदानांत ग्रामदान म्हणून मिळालेल्या १०० खेड्यांना २५ लाख रुपयांची मदत करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी १५ लाख रुपयांची रक्कम हातीं आलेली असून तिचा उपयोग करून खेड्यांतील लोकांना शेतीचीं हत्यारें पुरविणें, पाणीपुरवठ्याच्या सोयी करणें, विहिरी खोदणें आणि खेड्यांतून ग्रामोद्योग काढणें ह्या कामासाठी करण्यांत आला. ह्या मदतीचा लाभ महाराष्ट्रांतील ५९ खेड्यांना झाला. अलीकडे आणखी आलेली मदत लक्षांत घेतां ब्रिटिश संघटनेकडून आतांपर्यंत ग्रामदान खेड्यांना ४० लाख रुपये आले आहेत.

## दारूबंदीविरुद्ध मॅजिस्ट्रेटचा इषारा

मुंबईमधील एका सेवानिवृत्त मॅजिस्ट्रेटनें दारूबंदीविरुद्ध कडक इषारा दिला आहे. त्यांनीं दारूबंदीविषयक ३० हजार खटले आपल्या कारकीर्दींत ऐकले आणि त्यांचा निवाडा केला. त्यांनीं दिलेले निकाल हायकोर्टांतहि फिरलेले नाहींत. दारूबंदीच्या धोतांडामुळें अनेक नवे सामाजिक प्रश्न निर्माण झाले असून श्रीमंत असामींचा एक नवीन वर्ग निर्माण झालेला आहे. ह्या वर्गाला कायद्याबद्दल बिलकुल आदर नाहीं, इतकेंच काय पण दारूबंदी चालूं ठेवण्यांत त्यांचे स्वतःचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. त्यामुळें दारूबंदी रद्द करण्यास अगर तींत बदल करण्यास त्यांचा विरोध होत आहे. दारूबंदी अशीच चालू ठेवण्यांत आली तर देशावर आपत्ति कोसळल्याशिवाय राहणार नाहीं असे विचार त्यांनीं सडेतोडपणें व्यक्त केले आहेत.



## १९६४–६५ चें रेल्वे बजेट

(आकडे कोटी रु. चे)

| | १९६२–६३ प्रत्यक्ष | १९६३–६४ बजेट | १९६३–६४ दुरुस्त अंदाज | १९६४–६५ बजेट |
|---|---|---|---|---|
| वाहतुकीचें ठोक उत्पन्न ... | ५६६·७९ | ५९९·६९ | ६२२·२२ | ६६८·०० |
| चालू खर्च ... | ३६२·५२ | ३७९·१८ | ३९३·४८ | ४१४·८२ |
| घसारा फंडांत वर्ग ... | ६७·०० | ८०·०० | ८०·०० | ८३·०० |
| पेन्शन फंडांत वर्ग ... | — | — | — | १९·०० |
| इतर, किरकोळ खर्च ... | १३·९५ | १६·४० | १५·९६ | १७·०८ |
| एकूण ... | ४४३·४७ | ४७५·५८ | ४८९·४४ | ५३३·९० |
| निव्वळ जमा ... | १२३·३२ | १२४·११ | १३२·७८ | १३४·१० |
| मध्यवर्ती सरकारला देणें | | | | |
| (अ) गुंतलेल्या भांडवलावर डिव्हिडंड | ६८·७६ (४·२५% दरानें) | ८०·६१ | ८२·५३ (४·५०% दरानें) | ९०·७३ (५·७५% दरानें) |
| (ब) उतारूंच्या दरावरील कर | १२·५० | १२·५० | १२·५० | १२·५० |
| निव्वळ शिल्लक | ४२·०६ | ३१·०० | ३७·७५ | ३०·८७ |

### हनुमंतसिंगला स्टेट बँकेचा अभिनंदनपर संदेश

हनुमंतसिंगनें टेस्ट सामन्यांत पदार्पण करताच सेंचरी काढल्याबद्दल स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेअरमन, श्री. वेंकटप्पय्या ह्यांनीं त्याला वैयक्तिक आणि बँकेतर्फे अभिनंदनपर संदेश पाठविला आहे. हनुमंतसिंग हा स्टेट बँकेंतील एक अधिकारी आहे.

### तीन नये पैसेवाली नाणी

सध्यां टांकसाळींत पाडण्यांत येणाऱ्या नाण्यांपैकी ४०% नाणीं एक नया पैशाचीं असतात. टांकसाळीवरील हा ताण कमी करण्यासाठी तीन नये पैसेवाली नाणी लवकरच सुरू करण्यांत येणार आहेत.

### देना बँक शेअर ट्रॅन्स्फर फी घेणार नाहीं

देवकरण नानजी बँकिंग कंपनीच्या डायरेक्टरांनी १ एप्रिलपासून शेअर ट्रॅन्स्फर फी न आकारण्याचें ठरविलें आहे. त्या दृष्टीनें येत्या वार्षिक साधारण सभेंत आर्टिकल्स दुरुस्त करून घेण्यांत येतील.

### कस्तुरबा तिकीट

श्री. कस्तुरबा गांधी ह्यांच्या २० व्या मृत्युदिनानिमित्त पोस्ट आणि तार खातें १५ न. पैशांचे खास तिकीट दि. २२ फेब्रुवारी रोजीं काढणार आहे.

### साखळी ओढण्याचे गैरप्रकार

आगगाडीच्या डब्यांतील साखळी ओढून आगगाडी थांबविण्याचे प्रकार वाढत आहेत. १९६२ सालीं असे प्रकार ७४, २३९ वेळा झाले, त्यांपैकी ६३,५४६ वेळा साखळी ओढणें अप्रस्तुत असल्याचें आढळून आलें.

### एक हजाराच्या आणि पांचाच्या नव्या नोटा

एक हजार रुपयांच्या आणि पांच रुपयांच्या नव्या नोटा लवकरच काढण्यांत येतील. त्यांवर रिझर्व्ह बँकेचे विद्यमान गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य, ह्यांची सही राहील. १४ हिंदी भाषांत नोटेवर किंमत छापलेली असेल.


### दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं, कंपनीच्या भागीदारांची २९ वी वार्षिक साधारण सभा गुरुवार २ एप्रिल १९६४ रोजीं दुपारीं ३ वाजतां (भारतीय प्रमाण वेळ) गोखले हॉल, ९४८ सदाशिव पेठ, लक्ष्मी रस्ता, पुणें शहर या ठिकाणीं नेहमींचे कामकाजासाठी म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर १९६३ चा ताळेबंद व नफातोटापत्रक यांचा विचार करणें, डिव्हिडंड मंजूर करणें, निवृत्त होणाऱ्या संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें, हिशेब तपासनीसांची नेमणूक करणें वगैरे कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणाऱ्या कामकाजाचा तपशील, बँकेचा दिनांक ३१ डिसेंबर १९६३ अखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रक व संचालकांचा अहवाल भागीदारांस स्वतंत्रपणें पाठविण्यांत येत आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
पुणें, दिनांक ११, फेब्रुवारी १९६४ — सी. व्ही. जोग, जनरल मॅनेजर

सूचना—

१. बँकेचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें बुधवार दिनांक १८ मार्च १९६४ ते शनिवार दिनांक ४ एप्रिल १९६४ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

२. डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर ते दि. २ एप्रिल १९६४ रोजीं भागधारकांच्या रजिस्टरवर नांवें असलेल्या भागधारकांना शनिवार दिनांक ११ एप्रिल १९६४ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागधारकांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पाठविलीं जातील. पत्ताबदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.



दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## नैजेरियन व्यापाऱ्याचें हिंद-प्रेम

### इस्पितळासाठी ९० लक्ष रु. ची देणगी

नैजेरियांतील एका कोट्याधीश व्यापाऱ्यानें मुंबई शहरांत १०० खाटांचें एक प्रचंड इस्पितळ स्थापन करण्यासाठी ९० लक्ष रुपयांची देणगी देऊं केली आहे. रोगनिदानाच्या व्यवस्थेसाठी अमेरिकेंतील सुप्रसिद्ध मेयो हॉस्पिटलच्या धर्तीवर हें पॉलिक्लिनिक उभारण्यांत येईल. हें इस्पितळ पांच मजली होऊन पदव्युत्तर शिक्षणासाठी एक कॉलेजहि त्याच्या जोडीला असेल. हा धनिक जन्मानें हिंदी असून नैजेरियांत त्याचा रेशमी व सुती कापडाचा मोठा व्यापार चालतो. त्यानें नैजेरियाच्या सरकारला इस्पितळासाठी २ कोटी रु. ची देणगी नुकतीच दिली आहे. इस्पितळ चालविण्यासाठी एक ट्रस्ट निर्माण करण्यांत आला असून त्याचे श्री. स. का. पाटील हे प्रमुख आहेत.

---

### मध्यवर्ती मंत्री ९% स्वस्त पडला

मध्यवर्ती सरकारच्या ४७ मंत्र्यांवर १९६१-६२ मध्यें २१,२९,४८४ रु. खर्च झाले होते; १९६२-६३ मध्यें ५२ मंत्र्यांवर २१,६१,००३ रु. खर्च झाले. म्हणजे, प्रत्येक मंत्र्याचा खर्च सरासरीनें ४५,००० रु. वरून ४१,००० रु. वर उतरला; प्रत्येक मंत्री सरासरीनें ९% स्वस्त पडला.

---

### १५ नया पैशांचें कर्ज

मध्यवर्ती सरकारचे मंत्री श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांना श्री. अशोक सेन ह्यांनीं १५ नया पैशांचें तिकीट विकलें. श्री. सरोजिनी नायडूंच्या ८५ व्या जन्मशताब्दीचें तें खास तिकीट होतें. श्री. शास्त्री ह्यांनीं आपले खिसे तपासले, पण त्यांत कांहींच पैसे नव्हते. अर्थमंत्री, श्री. कृष्णम्माचारी, ह्यांनीं त्यांना १५ नये पैसे उसने दिले. "बिनव्याजी दीर्घ मुदतीचें हें कर्ज आहे, असें मी समजतों." असें श्री. शास्त्री प्रथम म्हणाले. पण नंतर ते म्हणाले, "मी कर्जफेड करणारच नाहीं. मी मुख्य मंत्र्यांचा कोट उसना घेतला, तो परत दिला नाहीं. तेव्हांपासून कुठलीहि गोष्ट परत न करण्याची मला संवयच लागली आहे.

---

### शिक्षण संस्थांना सहकारी सोसायटीद्वारां आर्थिक साहाय्य

शिक्षण संस्थांना कर्जरूपानें मदत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य लवकरच एक सहकारी शिक्षण कर्जपुरवठा सोसायटी स्थापन करणार आहे. इमारती बांधणें आणि उपकरणें खरीदणें, ह्यासाठी मुख्यतः ही सोसायटी कर्जें देईल.

---

### भाडें नियंत्रण कायदा : मुदतवाढ आणि दुरुस्त्या

सध्यांच्या भाडें नियंत्रण कायद्याची मुदत मार्च १९६४ अखेर संपत आहे; त्याची मुदत आणखी चार वर्षांनीं वाढविण्यांत येणार आहे. कांहीं विशिष्ट प्रकारच्या दुरुस्त्या करून त्यांचा खर्च भाडेकरूकडून वसूल करण्याचा अधिकार देणारें एक नवें कलम कायद्यांत समाविष्ट केलें जाईल. चालू भाड्यांत स्टँडर्ड रेटच्या २५% वाढ करून त्याची वसुली करता येईल. आणखी मजले बांधण्यासाठी गच्चीचा ताबा घरमालकांना मिळण्याची तरतूदहि करण्यांत येत आहे. सरकारी गॅझेटांत हें बिल प्रसिद्ध झालें आहे.


तुमचें स्थान कोणतें ?

लेखक : श्री. वा. काळे

पृ. सं. ११० ] ◆ [ किं. २ रु.






बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.



आतां ४ टक्के व्याजाची नवीन योजना



रिकरिंग डिपॉझिट स्कीम



महाराष्ट्र बँकेच्या रिकरिंग डिपॉझिट खात्यामध्यें दरमहा रु. १०/- अथवा दहाच्या पटींत रु. ५००/- पर्यंत कोणतीहि एक रक्कम टाकून ती सतत २४ महिने भरली असतां त्याचे शेवटीं तुम्हांस ४ टक्यानें व्याजासह रक्कम परत मिळते. उदाहरणार्थ—तुम्ही दरमहा रु. १०/- प्रमाणें दोन वर्षे पैसे भरले असतां मुदतीच्या अखेरीस रु. २५०/- परत मिळतात.

या योजनेंत भरपूर व्याज मिळतें आणि नियमितपणें बचतहि होतें.

मोफत माहिती पत्रकासाठी लिहा अगर बँकेच्या शाखेत येऊन भेटा.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.